OK

मुद्दा क्र-१

(2)

**वाळू / रेतीच्या निर्गतीबाबत.**

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
क्रमांक:- गौखनि- १०/०७०८/प्र.क्र.३२६/ख,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- ०५/०८/२००९

**वाचा :-** शासन पत्र क्र.गौखनि १०/०७०८/प्र.क्र.३२६/ख, दिनांक १६.९.२००८

## शासन परिपत्रक

उपरोक्त शासन पत्र दिनांक १६.९.२००८ च्या पत्रान्वये ज्या ग्रामसभांनी वाळू उपशाची शिफारस केली आहे ती वगळता इतर वाळू लिलावांना स्थगिती देण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

२. मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८.७.२००९ रोजी बैठक झाली असून, सदर बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदयांनी खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

१) वाळू उपशास नाहरकत प्रमाणपत्र देण्याचा प्रस्ताव ग्रामसभेने मंजूर / नामंजूर केल्यानंतर अशा ठरावामध्ये ६ महिन्याच्या कालावधीत कोणताही बदल करता येणार नाही.

२) वाळू उपशा संदर्भात घ्यावयाच्या ग्रामसभेसाठी संबंधित तहसिलदार, त्या कार्यक्षेत्रातील पोलीस अधिकारी व संबधीत तलाठी यांनी उपस्थित रहाणे आवश्यक असून ग्रामसभेतील निर्णयाबद्दलचा अहवाल तहसिलदार यांनी जिल्हाधिकारी यांना सादर करणे आवश्यक आहे.

३) शासकीय, निमशासकीय, सहकारी क्षेत्र तसेच वैयक्तिक घरबांधणीसाठी ग्रामसभेचा ठराव आवश्यक असणार नाही. यासंदर्भात संबधीत कार्यकारी अभियंता / उपअभियंता यांचे मान्यतेने त्या त्या प्रकल्पाची वाळूची गरज निश्चित करण्यात यावी.

**४) ज्या ग्रामसभांनी वाळू उपशाची शिफारस केली आहे ती वगळता इतर वाळू लिलावांना स्थगिती देण्याबाबतच्या सूचना सर्व विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी यांना देण्यात आल्या आहेत. सदर पत्रात जरी वाळू स्थळाचा लिलाव करण्यापूर्वी ग्रामसभेची सहमती घेण्याच्या सूचना दिल्या असल्या तरीही वाळूंचे कोणत्याही प्रकारे (परवाना इत्यादी ) होणाऱ्या उत्खननासाठी या सूचना लागू आहेत.**

५) दिनांक २८.७.२००९ रोजी चर्चेच्या वेळी मा.मुख्यमंत्री यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले आहे की, ग्रामसभांची सहमती नसतानाही वाळू उत्खनन (लिलावाने वा /अथवा परवाना देऊन) सुरु आहे.

ग्रामसभांची सहमती नसतानाही वाळू उत्खनन सुरु असल्याची किती प्रकरणे संदर्भिय सूचनांनंतर आढळून आली, त्या प्रकरणात अशा अवैध उत्खननासाठी जबाबदार असलेल्या अधिकारी /कर्मचारी यांच्यावर तसेच असे उत्खनन करणा-यांवर कारवाई करण्यात यावी.

६) शासन धोरणाविरुध्द एखाद्या ठिकाणी वाळू उपसा होत असेल तर ज्या संबंधीत अधिका-यांच्या कार्यक्षेत्रात असा उपसा होत असेल त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई सुरु करावी. सदर शिस्तभंगाची कारवाई १० दिवसात सुरु होईल याबाबत दक्षता घ्यावी. तसेच संबंधीत ठेकेदार यांच्यावर फौजदारी गुन्हा तहसिलदार यांनी दाखल करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने

(रविंद्र य. तलाईडे)
उप सचिव,
महसूल व वन विभाग

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी.